## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मे २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस-१२२६/४६८/प्र.क्र.-५१/२६/नेपक्षे, कपक्षे, पोपक्षे, अपक्षे/नवि-१२.—ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२१८/१६६५/ प्र.क्र. ७९/२०/नवि -१२, दिनांक २० एप्रिल, २०२१ अन्वये मुंबई महानगर प्रदेशाकरिता सुधारित प्रादेशिक योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना " असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम १५(१) च्या तरतुदींनुसार मंजूर केली असून ती दिनांक २० जून २०२१ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या उपकलम (१) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२२४/१२/प्र.क्र. २/२४/नवि-१२, दिनांक ४ मार्च, २०२४ अन्वये पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायत, विशेष नियोजन प्राधिकरण, विकास प्राधिकरण, क्षेत्र विकास प्राधिकरण आणि गावठाण क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचित क्षेत्र " असा करण्यात आला आहे) शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित म्हणजे सिडकोची (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महामंडळ" असा करण्यात आला आहे) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) यांनी दिनांक १ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्रान्वये, ४ (चार) क्षेत्रांसाठी, म्हणजे, १) नेरळ परिसर क्षेत्र, ज्यामध्ये अंबरनाथ तालुका, जि. ठाणे येथील १३ महसूली गावे आणि कर्जत तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे समाविष्ट आहेत ; २) कर्जत परिसर क्षेत्र– ज्यामध्ये कर्जत तालुका, जि. रायगड येथील २८ महसूली गावे समाविष्ट आहेत; ३) पोयनाड परिसर क्षेत्र– ज्यामध्ये अलिबाग तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे समाविष्ट आहेत ; आणि ४) अलिबाग परिसर क्षेत्र– ज्यामध्ये अलिबाग तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे समाविष्ट आहेत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" असा करण्यात आला आहे), उक्त प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याची विनंती शासनाच्या नगरविकास विभागास केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रांपैकी अलिबाग परिसर क्षेत्र हा उक्त महामंडळाच्या उक्त अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाच्या विनंतीचा विचार करून, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, उक्त क्षेत्रांचा नियोजनबद्ध आणि नियंत्रित विकास होण्यासाठी अलिबाग परिसर क्षेत्र हे उक्त महामंडळाच्या उक्त अधिसूचित क्षेत्रातून वगळणे आवश्यक असून उक्त महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती रद्द करणे आवश्यक आहे आणि उक्त क्षेत्रे अधिसूचित करून, उक्त प्राधिकरणाची त्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे ;

**त्याअर्थी आता, शासन याद्वारे,—**

अ. उक्त अधिनियमाच्या कलम १६० व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांन्वये, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या अलिबाग परिसर क्षेत्रातील ११ महसूली गावांसाठी शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (सिडको) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेली नेमणूक मागे घेण्यात येत आहे आणि सदर गावे उक्त अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात येत आहे.

ब. उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (क) मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त असलेल्या व इतर सर्व अधिकारांचा वापर करून, परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार १) अंबरनाथ तालुका, जि. ठाणे येथील १३ महसूली गावे आणि कर्जत तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र म्हणून ; २) कर्जत तालुका, जि. रायगड येथील २८ महसूली गावे कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र म्हणून ; ३) अलिबाग तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र म्हणून; आणि ४) अलिबाग तालुका, जि. रायगड येथील ११ महसूली गावे अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात येत आहे आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची उक्त क्षेत्रांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

क. सदर अधिसुचनेपुर्वी उक्त क्षेत्रांमध्ये इतर कोणतेही नियोजन प्राधिकरण कार्यरत असल्यास त्या कार्यरत असलेल्या नियोजन प्राधिकरणाचे कार्य **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून संपुष्टात येतील.

ड. उक्त अधिनियमात नमुद केल्यानुसारची कार्यपध्दती अवलंबून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रासाठी विकास प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली तयार करून प्रसिद्ध करावी आणि ती अधिनियमातील तरतुदींनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास मंजूरीकरीता सादर करावी, असे निदेश देत आहे.

इ. घोषित करित आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) नुसार विकास योजना प्रसिद्ध होईपर्यंत उक्त क्षेत्रांतील महसूली गावांकरिता मंजूर प्रादेशिक योजनेचे प्रस्ताव आणि एकत्रिकृत विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली लागू राहील.

फ. घोषित करित आहे की, नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्राकरिता नेरळ ममदापूर डॉमिटरी टाऊनशिपमध्ये समाविष्ट गावांच्या मंजूर विकास योजनेमधील प्रस्ताव आणि एकत्रिकृत विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली लागू राहतील.

ग. सदरची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. सदरची अधिसूचना व त्यासोबतची ‘ **परिशिष्ट -अ** ’, ‘ **परिशिष्ट-ब** ’ आणि अधिसूचित क्षेत्राची हद्द दर्शवणारा नकाशा खालील नमूद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील :—

(अ) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

(ब) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(क) जिल्हाधिकारी, ठाणे.

(ड) जिल्हाधिकारी, रायगड.

(इ) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

(फ) सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड.

**(शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२६/४६८/प्र.क्र.-५१/२६/नेपक्षे, कपक्षे, पोपक्षे, अपक्षे/नवि-१२, दिनांक १९ मे २०२६ सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट- अ**

**(सिडकोच्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या गावांची यादी)**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या गावांची नावे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | रायगड | अलिबाग | चेंढरे |
| २ | रायगड | अलिबाग | वरसोली |
| ३ | रायगड | अलिबाग | गोंधळपाडा |
| ४ | रायगड | अलिबाग | वेश्वी |
| ५ | रायगड | अलिबाग | थळ |
| ६ | रायगड | अलिबाग | वायशेत |
| ७ | रायगड | अलिबाग | खंडाळे |
| ८ | रायगड | अलिबाग | नेहुली |
| ९ | रायगड | अलिबाग | मुळे |
| १० | रायगड | अलिबाग | बामणोली |
| ११ | रायगड | अलिबाग | लोणारे |

**(शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२६/४६८/प्र.क्र.-५१/२६/नेपक्षे, कपक्षे, पोपक्षे, अपक्षे/नवि-१२, दिनांक १९ मे २०२६ सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट -ब**

**(नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र, कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र, पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र व अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्रांमध्ये समाविष्ट गावांची यादी)**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अधिसूचित क्षेत्रातील गावाचे नाव |
|---|---|---|---|
| **नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र** | | | |
| १ | रायगड | कर्जत | बोपेले |
| २ | रायगड | कर्जत | धामोते |
| ३ | रायगड | कर्जत | ममदापुर |
| ४ | रायगड | कर्जत | नेरळ |
| ५ | रायगड | कर्जत | बांधिवली |
| ६ | रायगड | कर्जत | बेडीसगांव |
| ७ | रायगड | कर्जत | भडवळ |
| ८ | रायगड | कर्जत | बोर्ले |
| ९ | रायगड | कर्जत | दामत |
| १० | रायगड | कर्जत | कोल्हारे |
| ११ | रायगड | कर्जत | शेलू |
| १२ | ठाणे | अंबरनाथ | सापे |
| १३ | ठाणे | अंबरनाथ | चामटोली |
| १४ | ठाणे | अंबरनाथ | दहिवली |
| १५ | ठाणे | अंबरनाथ | देवळोली |
| १६ | ठाणे | अंबरनाथ | जांभळे |
| १७ | ठाणे | अंबरनाथ | कासगांव |
| १८ | ठाणे | अंबरनाथ | सावरे |
| १९ | ठाणे | अंबरनाथ | डोणे |
| २० | ठाणे | अंबरनाथ | गोरेगाव |
| २१ | ठाणे | अंबरनाथ | कुडसावरे |
| २२ | ठाणे | अंबरनाथ | ढवळे |
| २३ | ठाणे | अंबरनाथ | ढवळेपाडा |
| २४ | ठाणे | अंबरनाथ | वांगणी |

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अधिसूचित क्षेत्रातील गावाचे नाव |
|---|---|---|---|
| **कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र** | | | |
| १ | रायगड | कर्जत | आंबिवली बुद्रुक |
| २ | रायगड | कर्जत | आसल |
| ३ | रायगड | कर्जत | बेकरे |
| ४ | रायगड | कर्जत | भानसोली |
| ५ | रायगड | कर्जत | चिंचवली |
| ६ | रायगड | कर्जत | डिकसळ |
| ७ | रायगड | कर्जत | गारपोली |
| ८ | रायगड | कर्जत | जिते |
| ९ | रायगड | कर्जत | कुंभे |
| १० | रायगड | कर्जत | माणगांव तर्फे वरेडी |
| ११ | रायगड | कर्जत | उक्रुळ |
| १२ | रायगड | कर्जत | वडवली तर्फे वरेडी |
| १३ | रायगड | कर्जत | एकसळ |
| १४ | रायगड | कर्जत | पाली तर्फे वरेडी |
| १५ | रायगड | कर्जत | आशाणे |
| १६ | रायगड | कर्जत | बामणोली |
| १७ | रायगड | कर्जत | बार्डी |
| १८ | रायगड | कर्जत | भुतिवली |
| १९ | रायगड | कर्जत | किरवली |
| २० | रायगड | कर्जत | कोशाणे |
| २१ | रायगड | कर्जत | सावरगाव |
| २२ | रायगड | कर्जत | उमरेली |
| २३ | रायगड | कर्जत | वांजळे |
| २४ | रायगड | कर्जत | वावे |
| २५ | रायगड | कर्जत | हालिवली |
| २६ | रायगड | कर्जत | लाडीवली |
| २७ | रायगड | कर्जत | देऊळवाडी |
| २८ | रायगड | कर्जत | पराडे |

**पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अधिसूचित क्षेत्रातील गावाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | रायगड | अलिबाग | पेझारी |
| २ | रायगड | अलिबाग | दिवलांग |
| ३ | रायगड | अलिबाग | भंगार दादाजी |
| ४ | रायगड | अलिबाग | तळबंद |
| ५ | रायगड | अलिबाग | घसवड |
| ६ | रायगड | अलिबाग | तळाणीखार |
| ७ | रायगड | अलिबाग | वालवडे |
| ८ | रायगड | अलिबाग | पोयनाड |
| ९ | रायगड | अलिबाग | आंबेपूर |
| १० | रायगड | अलिबाग | शहाबाज (भाग) |
| ११ | रायगड | अलिबाग | शहापूर (भाग) |
| **अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र** | | | |
| १ | रायगड | अलिबाग | चेंढरे |
| २ | रायगड | अलिबाग | वरसोली |
| ३ | रायगड | अलिबाग | गोंधळपाडा |
| ४ | रायगड | अलिबाग | वेश्वी |
| ५ | रायगड | अलिबाग | थळ |
| ६ | रायगड | अलिबाग | वायशेत |
| ७ | रायगड | अलिबाग | खंडाळे |
| ८ | रायगड | अलिबाग | नेहुली |
| ९ | रायगड | अलिबाग | मुळे |
| १० | रायगड | अलिबाग | बामणोली |
| ११ | रायगड | अलिबाग | लोणारे |

३. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* (Acts/Rules) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निर्मलकुमार चौधरी,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 19th May 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No.TPS-1226/468/CR-51/26/NSA, KSA, PSA, ASA/UD-12.—Whereas, the Government in Urban Development Department has sanctioned the Revised Regional Plan for the Mumbai Metropolitan Region (hereinafter referred to as " the said Regional Plan ") *vide* Notification No.TPS-1218/1665/C.R.79/20/UD-12, dated the 20th April, 2021 (hereinafter referred to as "the said Notification") as per the provisions of Section 15(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which has come into force with effect from 20th June, 2021 ;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed the City and Industrial Development Corporation (CIDCO) as a Special Planning Authority (hereinafter referred to as 'the said Corporation') under the provisions of sub-section (*1*) of the section 40 of the said Act, *vide* Notification No.TPS-1224/12/CR-2/24/UD-12, dated the 4th March, 2024 for the areas in the Districts of Palghar, Raigad, Ratnagiri and Sindhudurg excluding the area under Municipal Corporation, Municipal Councils and Nagar panchayat as well as Special Planning Authorities, Development Authorities and Area Development Authorities and Gaothan areas, as Special Planning Authority as specified therein (hereinafter referred to as "the said Notified Area") ;

And whereas, the Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as 'the said Authority') has requested Government in Urban Development Department *vide* letter dated 1st April 2026 to appoint the said Authority as a Special Planning Authority for the 4 (four) surrounding areas, namely, 1) Neral Surrounding Area which includes 13 revenue villages from Ambernath Tahsil, Dist. Thane and 11 revenue villages from Karjat Tahsil, Dist. Raigad 2) Karjat Surrounding Area which includes 28 revenue villages from Karjat Tahsil, Dist. Raigad 3) Poynad Surrounding Area which includes 11 revenue villages from Alibaug Tahsil, Dist. Raigad and 4) Alibaug Surrounding Area which includes 11 revenue villages from Alibaug Tahsil, Dist. Raigad (hereinafter referred to as ' the said Areas ') ;

And whereas, out of the said Areas, Alibaug Surrounding Area is included in the said Notified Area of the said Corporation ;

And whereas, considering the request of the said Authority and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and also after making necessary enquiries, the Government is of the opinion that for the planned and controlled development, it is necessary to exclude the Alibaug Surrounding Area from the said Notified Area of the said Corporation & the appointment of the said Corporation as a Special Planing Authority shall be withdrawn and also the Government is of the opinion that it is necessary to notify the said Areas & to appoint the said Authority as Special Planning Authority for the said Area ;

Now, therefore, the Government hereby :—

(A) In exercise of the powers conferred under section 160 of the said Act and all other powers enabling it in this behalf, withdraws the appointment of the City and Industrial Development

Corporation (CIDCO) as the Special Planning Authority for the 11 revenue villages of Alibaug Surrounding Area, more specifically mentioned in the *Schedule-A* appended hereto, are denotified from the said Notified Area.

(B) In exercise of the powers conferred under Sub-section (*1*)(*c*) of section 40 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, notifies 1) 13 revenue villages from Ambernath Tahsil, Dist. Thane and 11 revenue villages from Karjat Tahsil, Dist. Raigad as Neral Surrounding Notified Area 2) 28 revenue villages from Karjat Tahsil, Dist. Raigad as Karjat Surrounding Notified Area 3) 11 revenue villages from Alibaug Tahsil, Dist. Raigad as Poynad Surrounding Notified Area and 4) 11 revenue villages from Alibaug Tahsil, Dist. Raigad as Alibaug Surrounding Notified Area and appoints the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) as Special Planning Authority, more specifically mentioned in the *Schedule-B* appended hereto.

(C) Declares that any other Planning Authority functioning in the aforesaid area prior to this Notification shall cease to function from the date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazettee.*

(D) Directs the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) to prepare and publish the development proposals and development control regulations for the said notified area and submit the same to the Government for sanction after following due procedure prescribed in the said Act.

(E) Declares that the sanctioned Regional Plan proposals and the Unified Development Control and Promotion Regulation for the revenue villages of the sanctioned Regional Plan shall be applicable till the publication of the Development Plan under section 26(1) of the said Act.

(F) Declares that the sanctioned Development Plan proposals of the villages included in Neral-Mamdapur Dormitary Township and the Unified Development Control and Promotion Regulation shall be applicable in the Neral Surrounding Notified Area.

(G) Fixes the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazzette* as the date of coming into force of this notification.

2. The notification along with the *Schedule*-A & *Schedule-B* and the copy of the plan showing the boundaries of the said notified area shall be available for inspection for the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month.

(*i*) Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority, MMRDA, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai- 51.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Collector, Thane.

(*iv*) The Collector, Raigad.

(*v*) The Assistant Director of Town Planning, Raigad Branch, Dist. Thane.

(*vi*) The Assistant Director of Town Planning, Raigad Branch, Dist. Raigad.

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notification No. TPS-1226/468/CR.51/26/NSA, KSA, PSA, ASA/UD-12, dated 19th May 2026.**

*Schedule-A*

**(List of villages excluded from CIDCO Special Planning Authority Area)**

| Sr. No. | District | Taluka | Name of villages in the notified Area. |
|---|---|---|---|
| **Alibag Surrounding Notified Area** | | | |
| 1 | Raigad | Alibaug | Chedndhare |
| 2 | Raigad | Alibaug | Varsoli |
| 3 | Raigad | Alibaug | Gondhalpada |
| 4 | Raigad | Alibaug | Veshvi |
| 5 | Raigad | Alibaug | Thal |
| 6 | Raigad | Alibaug | Vaishet |
| 7 | Raigad | Alibaug | Khandale |
| 8 | Raigad | Alibaug | Nehuli |
| 9 | Raigad | Alibaug | Mule |
| 10 | Raigad | Alibaug | Bamanoli |
| 11 | Raigad | Alibaug | Lonare |

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notification No. TPS-1226/468/CR.51/26/NSA, KSA, PSA, ASA/UD-12, dated 19th May 2026.**

*Schedule-B*

**(List of villages included in Neral Surrounding Notified Area, Karjat Surrounding Notified Area, Poynad Surrounding Notified Area and Alibaug Surronding Notified Area)**

| Sr. No. | District | Taluka | Name of villages in the notified Area. |
|---|---|---|---|
| **Neral Surrounding Notified Area** | | | |
| 1 | Raigad | Karjat | Bopele |
| 2 | Raigad | Karjat | Dhamote |
| 3 | Raigad | Karjat | Mamdapur |
| 4 | Raigad | Karjat | Neral |
| 5 | Raigad | Karjat | Bandhivali |
| 6 | Raigad | Karjat | Bedisgaon |
| 7 | Raigad | Karjat | Bhadval |
| 8 | Raigad | Karjat | Borle |
| 9 | Raigad | Karjat | Damat |
| 10 | Raigad | Karjat | Kolhare |
| 11 | Raigad | Karjat | Shelu |

| Sr. No. | District | Taluka | Name of villages in the notified Area. |
|---|---|---|---|
| 12 | Thane | Ambernath | Sape |
| 13 | Thane | Ambernath | Chamtoli |
| 14 | Thane | Ambernath | Dahivali |
| 15 | Thane | Ambernath | Devloli |
| 16 | Thane | Ambernath | Jambhale |
| 17 | Thane | Ambernath | Kasgaon |
| 18 | Thane | Ambernath | Savare |
| 19 | Thane | Ambernath | Done |
| 20 | Thane | Ambernath | Goregaon |
| 21 | Thane | Ambernath | Kudsavare |
| 22 | Thane | Ambernath | Dhavale |
| 23 | Thane | Ambernath | Dhavalepada |
| 24 | Thane | Ambernath | Wangani |
| **Karjat Surrounding Notified Area.** | | | |
| 1 | Raigad | Karjat | Ambivali Bk. |
| 2 | Raigad | Karjat | Aasal |
| 3 | Raigad | Karjat | Bekare |
| 4 | Raigad | Karjat | Bhansoli |
| 5 | Raigad | Karjat | Chichavali |
| 6 | Raigad | Karjat | Diksal |
| 7 | Raigad | Karjat | Garpoli |
| 8 | Raigad | Karjat | Jite |
| 9 | Raigad | Karjat | Kumbhe |
| 10 | Raigad | Karjat | Mangaon Tarf Waredi |
| 11 | Raigad | Karjat | Ukrul |
| 12 | Raigad | Karjat | Vadavali Turf Waredi |
| 13 | Raigad | Karjat | Eksal |
| 14 | Raigad | Karjat | Pali Turf Waderi |
| 15 | Raigad | Karjat | Aashane |
| 16 | Raigad | Karjat | Bamnoli |
| 17 | Raigad | Karjat | Bardi |
| 18 | Raigad | Karjat | Bhutivali |
| 19 | Raigad | Karjat | Kiravali |
| 20 | Raigad | Karjat | Koshane |

| Sr. No. | District | Taluka | Name of villages in the notified Area. |
|---|---|---|---|
| 21 | Raigad | Karjat | Savargaon |
| 22 | Raigad | Karjat | Umroli |
| 23 | Raigad | Karjat | Waanjale |
| 24 | Raigad | Karjat | Vave |
| 25 | Raigad | Karjat | Halivali |
| 26 | Raigad | Karjat | Ladivali |
| 27 | Raigad | Karjat | Deolwadi |
| 28 | Raigad | Karjat | Parade |
| **Poynad Surrounding Notified Area** | | | |
| 1 | Raigad | Alibaug | Pezari |
| 2 | Raigad | Alibaug | Divlang |
| 3 | Raigad | Alibaug | Bhangar Dadaji |
| 4 | Raigad | Alibaug | Talband |
| 5 | Raigad | Alibaug | Ghasvad |
| 6 | Raigad | Alibaug | Talanighar |
| 7 | Raigad | Alibaug | Walwade |
| 8 | Raigad | Alibaug | Poynad |
| 9 | Raigad | Alibaug | Aambepur |
| 10 | Raigad | Alibaug | Shahabaz (Part) |
| 11 | Raigad | Alibaug | Shahapur (Part) |
| **Alibaug Surrounding Notified Area** | | | |
| 1 | Raigad | Alibaug | Chendhare |
| 2 | Raigad | Alibaug | Varsoli |
| 3 | Raigad | Alibaug | Gondhalpada |
| 4 | Raigad | Alibaug | Veshvi |
| 5 | Raigad | Alibaug | Thal |
| 6 | Raigad | Alibaug | Vaishet |
| 7 | Raigad | Alibaug | Khandale |
| 8 | Raigad | Alibaug | Nehuli |
| 9 | Raigad | Alibaug | Mule |
| 10 | Raigad | Alibaug | Bamanoli |
| 11 | Raigad | Alibaug | Lonare |

3. This Notification shall also be available on the Govt. of Maharashtra website : *www.maharashtra.gov.in* ( Acts/Rules ).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.